दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागरा राणा अंभोरे   संपादक : बंडूभाऊ इंगोले
RNI No - MHMUL/25/A0788
■ वाशीम   ■ गुरुवार, ०५ मार्च २०२६   ■ वर्ष : २   ■ अंक : ३२५   ■ पाने : ४   ■ किंमत : ५ रूपये   ■ Title code:- MAHMUL039353

## जविकिरण काव्य मैफल उत्साहात संपन्न



महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे :** जविकिरण काव्य मैफल आणि स्वरसंगम फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मीरा रोड येथील विरंगुळा केंद्र सभागृहात एक काव्य मैफल आयोजित करण्यात आली होती. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ गझलकार कवी सुनील ओवाळ होते. ज्येष्ठ हिंदी साहित्यिक कवी हृदयेश मयंक, ज्येष्ठ गझलकार भागवत बनसोडे, सद्धम्मकार प्रा. आनंद देवडेकर, कवी प्रा.डॉ.अनिल साबळे, कवयित्री प्रांजली काळबेंडे, कवी मुस्तहसन अज्म कवी डॉ. मुक्खतार खान, कवयित्री प्रा. संध्या वैद्य यांच्यासह ज्यांच्या नावातील जवि या आद्याक्षरांवरून ही संकल्पना सुचली ते मराठीतील ज्येष्ठ आंबेडकरवादी कवी ज.वि. पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत ही मैफल संपन्न झाली . जविकिरण काव्य मैफलीचे चिटणीस प्रा. उत्तम भगत यांनी सूत्रसंचालन केले. या संमेलनात बालिका संबोधी मोरे व बाळासाहेब झोडगे , अशोक चाफे , विनिशा धामणकर , जुल्मीरामसिंग यादव , राकेश शर्मा, अशोक कांबळे , जगदेव भटू , अनिल गौड, राजेश बडेकर , सिद्धार्थ वानखडे , के. पुरुषोत्तम , प्रा. भीमराव पेटकर, डॉ. मनाली मोरे , प्रा. राहुल पांडे, बी. बी. गमरे, बबन जाधव , सरोजा गजरे, भास्कर बाजड , चंद्रमणी मनवर, चंद्रकांत घाटगे आदी एकूण ३२ कवींनी आपल्या काव्यरचना सादर केल्या. सिने-नाट्य सृष्टीतील हरहुन्नरी कलाकार अशोक चाफे यांनी केलेल्या आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी स्वरमाउली फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

## परदेशात अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांना सुरक्षित परत आणणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** युद्धजन्य परिस्थितीमुळे काही देशांची हवाई वाहतूक सेवा बंद झाल्यानंतर परदेशात अडकलेल्या भारतीयांबाबत राज्य शासन सतर्क असून त्यांना सुरक्षित परत आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.

विधान परिषद सदस्य संजय केनेकर, ॲड. निरंजन डावखरे, सत्यजित तांबे, ॲड. अनिल परब, शशिकांत शिंदे यांनी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनद्वारे परदेशात अडकलेल्या भारतीयांना परत आणण्यासंदर्भात महाराष्ट्र शासन करत असलेल्या उपाययोजनासंदर्भात प्रश्न विचारला होता.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हवाई वाहतूक सेवा बंद झाल्यानंतर पर्यटक, व्यावसायिक तसेच ट्रान्झिटमध्ये असलेल्या नागरिकांचे संदेश आल्यानंतर तत्काळ केंद्र शासनाच्या परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क साधण्यात आला. त्याचबरोबर संबंधित देशांतील भारतीय दूतावासांना सक्रिय करण्यात आले असून नागरिकांना दूतावासाशी संपर्क साधण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**मंत्री गिरीश महाजन यांच्यावर समन्वयाची जबाबदारी**

आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्यावर समन्वयाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. नागरिकांसाठी विशेष व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक जाहीर करण्यात आला असून त्यावरून येणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मंत्री महाजन यांनी व्हिडिओ कॉलद्वारे अडकलेल्या अनेक नागरिकांशी संवाद साधला आहे.




मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजेश गावंडे यांनाही जबाबदारी देण्यात आली असून त्यांनी दूतावासांसोबत बैठक घेऊन आवश्यक एसओपी नागरिकांपर्यंत पोहोचविल्या आहेत. या सूचनांची माहिती 'एक्स' (ट्विटर) खात्यावरूनही प्रसारित करण्यात आली आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**केंद्र सरकारकडूनच परत आणण्याची प्रक्रिया**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, राज्य शासनाने महाराष्ट्रातील नागरिकांना परत आणण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याची तयारी दर्शविली होती. मात्र केंद्र सरकारने सध्या असुरक्षित हवाई वाहतुकीमुळे ही प्रक्रिया केंद्राच्या अखत्यारितच ठेवण्याचा सल्ला दिला आहे. विविध राज्यांनी स्वतंत्र प्रयत्न केल्यास गोंधळ निर्माण होऊ शकतो, असेही केंद्राचे मत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.सध्या एअर इंडियाची काही विमाने संबंधित ठिकाणी जाऊ लागली असून टप्प्याटप्प्याने नागरिकांना परत आणले जात आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत परिस्थितीत सुधारणा होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

## सिंदखेड पोलिसांची पैनगंगा नदीपात्रात धडाकेबाज कारवाई!

### सपोनि रमेश जाधवर यांच्या नेतृत्वाखाली 3 अवैध तराफे जाळून केले नष्ट, महसूल व पोलिसांचा संयुक्त दणका

महाराष्ट्र जीत

**श्रीक्षेत्र माहूर/सुभाष खडसे :** तालुक्यातील गोकुळ व सायफळ शिवपरिसरातील पैनगंगा नदीपात्रात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा सुरू असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे महसूल विभाग आणि सिंदखेड पोलिसांनी रविवारी संयुक्तपणे मोठी कारवाई करत वाळू माफियांना जोरदार दणका दिला,सिंदखेड पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक रमेश जाधवर यांच्या धाडसी नेतृत्वाखाली ही कारवाई पार पडली.



मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी माहूर तहसील कार्यालयातील महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नदीकाठ गाठून परिस्थितीचा आढावा घेतला.त्यानंतर सिंदखेडचे सपोनि रमेश जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेतली.राणीधानोरा आणि गोकुळ अशा दोन्ही बाजूंनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने नदीपात्राला वेढा घालण्यात आला.यावेळी पोलिस व महसूल पथकाने प्रत्यक्ष नदीपात्रात उतरून तपासणी केली.

तपासणी दरम्यान नदीपात्रात वाळू उपसा करण्यासाठी वापरले जाणारे 3अवैध तराफे आढळून आले. संबंधित व्यक्तींकडे वाळू उपशाबाबत कोणतेही वैध परवाने नसल्याचे स्पष्ट होताच, प्रशासनाने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली.सपोनि रमेश जाधवर यांच्या उपस्थितीत हे तिन्ही तराफे जागीच जाळून नष्ट करण्यात आले.नदीपात्रातून निघणाऱ्या काळ्या धुराच्या लोटामुळे वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत.या धडाकेबाज कारवाईमुळे वाळू उपसा करणारे आणि अवैध वाहतूक करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.यापूर्वीही महसूल विभागाकडून अशा अनेक कारवाया करण्यात आल्या. जागोजागी ट्रॅक्टर, टीप्पर पकडले गेले पण रेती चोरी काही थांबत नाही.म्हणून नदीपात्रातील नैसर्गिक संपत्तीचे रक्षण करण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सुरूच राहणार असल्याचे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असल्याची माहिती सपोनि रमेश जाधवर यांनी दिली आहे.

## घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन प्रक्रियेत ग्राम पातळीवर ग्रामपंचायतने महिलांचा सहभाग घ्यावा

### राज्यस्तरीय प्रशिक्षक प्रविण पट्टेबहादूर यांचे प्रशिक्षण कार्यशाळेत प्रतिपादन

महाराष्ट्र जीत

**वाशिम (प्रतिनिधी) :** स्वच्छ भारत मिशन टप्पा 2 अंतर्गत कचऱ्याचे विलगीकरण सार्वजनिक स्वच्छता आणि वर्तणूक बदल घडवणे बाबत वाशिम तालुक्यातील महिला बचत गटांची प्रशिक्षण सुरू आहे. यामध्ये महिला बचत गटांच्या प्रतिनिधींना घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन कचरा विलगीकरण याबाबत सविस्तर वेगवेगळे विषय त्यांचे समोर मांडून त्यांना प्रशिक्षित करण्याचे देणे सुरू आहे.यावेळी राज्यस्तरीय प्रशिक्षक प्रविण पट्टेबहादुर यांनी आपल्या विषयी मांडत असताना सांगितले की,ग्राम पंचायत पातळीवर महिलांचा सहभाग असणे अत्यंत गरजेचे आहे.व त्याचबरोबर घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन करण्यामध्ये महिलांची भूमिका





देखील अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.म्हणून राज्य शासन स्तरावरून महिलांना आता याबाबतीत प्रशिक्षण देणे सुरू आहे.ओला कचरा, सुका कचरा,ई कचरा घातक कचरा अशा विविध विषयावर प्रवीण पट्टेबहादूर हे महिलांना सविस्तर माहिती देण्याचा प्रयत्न करत आहेत. वैयक्तिक स्वच्छता सार्वजनिक, स्वच्छता याबाबत देखील आपण बदल घडवणे गरजेचे आहे.तसेच आपण छोट्या छोट्या गोष्टींचा विचार करून आपण आपली वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता ठेवणे देखील महत्त्वाचे आहे जर आपण वैयक्तिक व सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता ठेवली तर भविष्यात रोगराईला किंवा दुर्गंधीला आळा बसेल आणि आपले आरोग्य हे उत्तम राहील.म्हणून ग्रामपंचायत पातळीवर महिलांचा या स्वच्छता घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन मध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका असल्याची राज्यस्तरीय प्रशिक्षक प्रवीण पट्टेबहादूर यांनी महिलांना प्रशिक्षण देत असताना वेगवेगळ्या विषयात सविस्तर माहिती दिली.यावेळी इतर विषय घेण्यासाठी अन्य प्रशिक्षक देखील आपले कार्य पार पाडत आहेत.त्याचबरोबर वरिष्ठ पातळीवरून देखील अधिकारी कर्मचारी या प्रशिक्षणाला भेट देऊन मार्गदर्शन करीत आहेत.या सदर प्रशिक्षणाला महिलांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देखील मिळत आहे.

## सिंहस्थ कुंभमेळा 2027' कार्यसमितीमध्ये इतर क्षेत्रातील व्यक्तींसह जेष्ठ समाजसेवकांना देखील सहभागी करा - नाशिकभूषण अमोलभाऊ भागवत

महाराष्ट्र जीत

**नाशिक प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने सिंहस्थ कुंभमेळा 2027 साठी असलेल्या कार्यसमिती मध्ये विविध क्षेत्रातील अनुभवी, जेष्ठ व सक्रीय समाजसेवकांना सामिल करून घेणे अत्यंत गरजेचे आहे.. या संबंधी कुभमेळा समिती अध्यक्ष, नाशिक विभागीय आयुक्त प्रविण गेडाम यांच्यासह सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच नाशिक जिल्हाधिकारी भा.प्र.से. आयुष प्रसाद यांची देखील सहमती घेऊन नाशिक प्रभारी पालकमंत्री यांना याबाबत पत्र देऊन ह्यामधील उपयुक्तता स्पष्ट करण्यात आली



यावेळी राष्ट्रीय सरचिटणीस अमोलभाऊ भागवत, अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस रोहिणीताई वाघ, जनसेविका गिताताई शामसुका, डॉ. पार्वती लकारिया, तालुकाध्यक्ष सविताताई आहेर, शिवसेना नेत्या रंजनाताई थोरवे, शहरप्रमुख जावेदभाई शेख, जनसेविका आशाताई भोईर, जनसेविका सुनंदाताई विस्पुते, दिव्यांग जिल्हाध्यक्ष सूरदास पावसे, जनसेवक विष्णू भाऊ कातोरे, जनसेविका वंदनाताई काळे, श्री अनिल पऱ्हे, सचिव श्यामभाऊ जाधव, अमोल पवार, शहरप्रमुख जावेदभाई शेख, उपाध्यक्ष दिलीपभाऊ गायकवाड, मा. तुषारजी शामसुका, दर्शना संदिप आहिरे, सुलोचना विलास शिंदे, संघटक सुवर्णाताई उदावंत, जनसेविका दिपालीताई वाणी, कलाधयक्ष संजय बलकवडे, श्यामभाऊ डावरे, राहुल मोरे, तानाजी भोज, संजय शिंदे, विशाल आर, सुनील पाटील, बाळासाहेब साळवे, दिनेश गवारे उपस्थित होते. सिंहस्थ कुंभमेळयाच्या व्यवस्थापनात धार्मिक, सांस्कृतिक, पर्यटन आणि नागरी सोई-सुविधा या क्षेत्रांच्या विकासाला चालना मिळावी याची दखल घेणे अत्यावश्यक आहे ही मागणी राष्ट्रीय सरचिटणीस अमोलभाऊ भागवत यांच्यासह सर्वसमाजसेवकांनी केली

कुंभमेळा 2027 च्या नियोजनासाठी जिल्हा प्रशासन किंवा विशेष 'नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण' नियुक्त समितीमध्ये अनुभवी समाजसेवकांना सामिल करावे अशी सर्वसामान्य जनतेची व सामाजिक क्षेत्रातील प्रतिनिधींची असलेली योग्य इच्छा अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने प्रशासनाला करण्यात आली. (NTKMA) नुसार पायाभूत सुविधा विकास, स्वच्छता व कचरा व्यवस्थापन, सुरक्षा व संरक्षक व्यवस्था, वाहतूक व गतीशीलतेचे नियोजन, डिजिटल सक्षमकरण, भाविकांना सुविधा उपलब्ध करून देणे तसेच विविध शासकीय विभागांमध्ये समन्वय साधण्यास सहकार्य करू, लाखो भाविक व पर्यटकांना सुरक्षित, सर्वसमावेशक व समृद्ध असा अनुभव देण्यासाठी आम्ही समाजसेवक कार्यशील असू असे आश्वासन उपस्थितांकडून देण्यात आले.

## काळाराम मंदिर सत्याग्रही स्मारक उभारा – महाराष्ट्र रत्न अनिलभाई गांगुर्डे

महाराष्ट्र जीत

**नाशिक प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** भिमटोला सामाजिक संघटनेच्या वतीने नाशिक येथे काळाराम मंदिर कोनशिला व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास अभिवादन करून काळाराम मंदिर सत्याग्रहींना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते तथा भिमटोला सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र रत्न अनिलभाई गांगुर्डे होते..



याप्रसंगी गांगुर्डे यांनी पत्रकारांना प्रतिक्रिया देताना सांगितले की नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह पाच साडेपाच वर्ष परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्वाखाली लढला गेला असून ह्या समतेच्या लढ्यात अनेक सत्याग्रहींनी आपले योगदान दिले आहे त्यांच्या स्मृती तेवत ठेवण्यासाठी नाशिक येथे भव्य सत्याग्रही स्मारक उभारण्याची मागणी राज्य सरकारकडे गांगुर्डे यांनी केली.याप्रसंगी भिमटोला सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र रत्न अनिलभाई गांगुर्डे, रियल नॅशनल पॅंथरचे राष्ट्रीय अध्यक्ष भीमश्री विजयराज पगारे, नाशिक शहराध्यक्ष मुकुंद काळे, समाजभूषण सुभाष बोराडे, जिल्हा नेते विनोदभाऊ जाधव, नाशिक रोड जयंती अध्यक्ष आकाश भालेराव, जिल्हा नेते भारतजी म्हसदे, जिल्हा नेते दिलीपजी पगारे, जिल्हा नेते किशोरभाऊ गांगुर्डे, जिल्हा नेते सुनीलभाई यशवंते, जिल्हा नेते गोटीरामजी पवार, सामाजिक कार्यकर्ते संजयजी भालेराव, सामाजिक कार्यकर्ते ताराचंदजी काळे, महिला आघाडीच्या नेत्या विमलताई तडवी, युवा नेते प्रशांत गांगुर्डे आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते..!

## संपादकीय

### विध्वंसाच्या वाटेवर...

प्रत्येक बेमुर्वतखोर, बेजबाबदार नेत्याच्या आयुष्यात एक क्षण असा येतो तेथून त्याची कारकीर्द झपाट्याने उतरणीस लागते. इराणवरील हल्ल्याचा निर्णय हा क्षण अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कारकीर्दीचा असा मध्यबिंदू असेल. असे ठामपणे म्हणता येते याचे कारण स्वत:च्या नसलेल्या युद्धात ट्रम्प यांनी अमेरिकेस ओढले आणि इस्रायलचे पंतप्रधान नरसंहारकारी बेंजामिन नेतान्याहू यांचा नवस फेडण्याची जबाबदारी स्वत:च्या डोक्यावर घेतली. इस्रायल स्वत:चे युद्ध लढू शकत नाही हा आतापर्यंतचा इतिहास आहे. अमेरिकेने पाठकुळी घेतल्याखेरीज इस्रायल चार पावलेही चालू शकत नाही, हादेखील याच इतिहासाचा भाग. त्याचीच पुनरावृत्ती पुन्हा एकदा झाली. गेल्या वर्षी डिसेंबरपासून नेतान्याहू यांनी इराणवर हल्ला करण्यासाठी ट्रम्प यांच्यामागे भुणभुण लावलेली होती. त्याच वेळी ट्रम्प हे इराणशी वाटाघाटींतून मार्ग काढण्याच्या प्रयत्नात होते. आताही गेल्याच आठवड्यात अमेरिका आणि इराण यांच्यात कराराच्या चर्चेची फेरी झाली. ती यशस्वी होण्यात युद्धखोर नेतान्याहू यांचे अपयश दडले होते. कोणत्याही परिस्थितीत अमेरिका आणि इराण यांच्यात करार होऊ नये हा नेतान्याहू यांचा प्रयत्न होता.

आपल्याकडे बोफोर्स, टू जी घोटाळा हे जितके सत्य तितकेच इस्रायलमध्ये 'इराणी अणुबॉम्ब' हे राजकीय सत्य आहे. खरे तर इराण अणुबॉम्ब बनवत नाही असे प्रमाणपत्र आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगापासून अनेकांनी दिलेले असतानाही या इराणी अणुबॉम्बच्या धोक्याचे तुणतुणे नेतान्याहू वाजवत असतात. कारण विख्यात ब्रिटिश इतिहासकार सॅम्युएल जॉन्सन म्हणून गेला त्याप्रमाणे कोणत्याही बदमाशाप्रमाणे देशभक्ती हा नेतान्याहू यांचाही शेवटचा आसरा आहे. त्याचा पाया अन्यांच्या प्राणावर बेतलेला असल्याने कोणाचे ना कोणाचे तरी प्राण घेत राहणे हे नेतान्याहू यांच्यासाठी गरजेचे आहे. इराणी युद्धाचा घाट त्यासाठी.

तो नेतान्याहू यांनी घातला आणि ट्रम्प त्या सापळ्यात नेहमीप्रमाणे पूर्ण अडकले. नेतान्याहू आणि सौदी अरेबियाचा भावी राजा महंमद बिन सलमान 'एमबीएस' यांनी हे युद्ध अमेरिकेवर कसे लादले याचे साद्यंत साधार वृत्तांत अनेक नामांकित अमेरिकी माध्यमांनी गेल्या दोन दिवसांत छापले. तेथील माध्यमे आपले नियतकर्तव्य करत असल्यामुळे टकर कार्लसनसारख्या कडव्या उजव्या ट्रम्पवाद्यासही या युद्धाचे समर्थन करणे अशक्य झाले. ट्रम्प यांनी नेतान्याहू यांच्या जाळ्यात अडकू नये असेच मत टोकाचा उजवा असूनही त्याचे आहे. ही बाब त्या देशातील उजव्यांत तरी काही शहाणपण शिल्लक असल्याचे दर्शवते. म्हणून ती कौतुकास्पदही ठरते. वास्तविक इतिहासात खुद्द ट्रम्प आणि वर्तमानात त्यांचे विद्यमान सहकारी – परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांचेही असेच मत होते/आहे. अध्यक्षपदी बराक ओबामा असताना ट्रम्प यांनी पश्चिम आशियात कोणत्याही नव्या युद्धात अमेरिकेने सहभागी होऊ नये असे मत जाहीरपणे व्यक्त केले होते आणि ओबामा हे अमेरिकेस युद्धाच्या खाईत लोटतील अशी आवई उठवली होती. प्रत्यक्षात ओबामा यांनी इराणशी करार केला आणि विरोधात असताना व्यक्त केलेल्या भूमिकेच्या बरोबर उलट करत ट्रम्प यांनी अमेरिकेवर युद्धे लादली. आधी व्हेनेझुएलाचे. आता इराणचे. कारण नेतान्याहू यांच्याप्रमाणेच त्यांनाही युद्धाची तीव्र गरज होती.

एपस्टीन फाइल्स, सर्वोच्च न्यायालयाने आयातशुल्क बेकायदा ठरवून दिलेला दणका आणि मुख्य म्हणजे अवघ्या सहा महिन्यांवर येऊन ठेपलेल्या मध्यावधी निवडणुका आदी आव्हान-वेदनांपासून ट्रम्प यांस मुक्ती हवी होती. तशी संधी नेतान्याहू यांनी दिली. हे सत्य सोमवारच्या पत्रकार परिषदेत रुबियो यांच्या तोंडून निघून गेले. इस्रायलमुळे अमेरिका या युद्धात ओढली गेली अशा अर्थाचे विधान रुबियो यांनी केले. देशांतर्गत आव्हानांनी जर्जर झालेल्या दोन राष्ट्रप्रमुखांस थारेपालटाची गरज होती. म्हणून या युद्धाचा घाट घातला गेला, हे वास्तव.

# राज्य स्तरीय ग्राहक जनजागृती अभियान मेळावा व राज्य स्तरीय पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

महाराष्ट्र जीत

**नाशिक प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** ग्राहक (उपभोक्ता) संरक्षण समिती चा 5 वा वर्धापन दिनानिमित्त आयोजित राज्य स्तरीय ग्राहक जनजागृती अभियान मेळावा व राज्य स्तरीय पुरस्कार वितरण सोहळा त्याच बरोबर आरोग्य शिबीर व नेत्ररोग निदान शिबिर संपन्न या सदर कार्यक्रमाचे उद्धाटक साहित्यिक ज्येष्ठ विचारवंत सकाळचे संपादक श्री उत्तमराव कांबळे सर त्याचबरोबर माननीय दुर्गाताई तांबे माजी नगराध्यक्ष संगमनेर व एसएमबीटी संचालिका यांच्या उपस्थितीमध्ये ग्राहक संरक्षण समितीचा पाचवा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला त्याचबरोबर व्यासपीठावर संविधान प्रतिमा व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली यावेळी सदर कार्यक्रमांमध्ये आरोग्य निदान शिबिर त्याचबरोबर नेत्ररोग निदान शिबिराचे उद्धाटन माननीय संस्थापक अध्यक्ष दादाभाऊ केदारे व साहित्यिक उत्तमराव कांबळे सर दुर्गाताई तांबे त्याचबरोबर नगरसेविका दिपालीताई गीते यांच्या उपस्थितीत आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले त्याचबरोबर महाराष्ट्रातून समाज सुधारक विविध क्षेत्रातून उल्लेखनीय कार्य करणारे समाजसेवक यांना राज्यस्तरीय व राष्ट्रीयस्तरीय पुरस्कार देऊन मान्यवरांनी सन्मानित



करण्यात आले यावेळी व्यासपीठावर मनोगत व्यक्त करताना साहित्य उत्तमराव कांबळे यांनी विधान परिषद व संसद या ठिकाणी स्वीकृत आमदार म्हणून ग्राहक संघटनेला प्रतिनिधी मिळावं अशी प्रतिपादन यावेळी त्यांच्या भाषणातून करण्यात आले व ग्राहकांची ताकद ही खूप मोठी आहे ग्राहक संरक्षण कायदा हा प्रत्येकासाठी आहे आणि तो आपण सर्वांनी अमलात आणला पाहिजे असे प्रतिपादन यावेळी साहित्य कांबळे सर यांनी भाषणातून केले यावेळी दुर्गाताई तांबे यांनी उपस्थित ग्राहकांना योग्य असं मार्गदर्शन केले त्याचबरोबर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दादाभाऊ केदारे यांनीही व्यासपीठावरून अध्यक्ष भाषणातून जागो ग्राहक जागो शुद्ध केले युद्ध जब कोई ना सूने तो हमारे समिती को चुने या ब्रीदवाक्याने लोकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण करून ज्या ग्राहकांना अडचणी येथे असतील त्यांची फसवणूक होत असेल त्यांची लूट होत असेल अशांनी आमच्या समितीला व आमच्या पदाधिकाऱ्यांना संपर्क करावा व जागृत रहावा असे आव्हान यावेळी दादाभाऊ केदारे यांनी केले त्याचबरोबर आलेल्या सर्व मान्यवरांनी आपल्या भाषणातून ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे अध्यक्ष यांचे कौतुक करून आलेल्या सर्व ग्राहक राजांना व पुरस्कार त्यांना शुभेच्छा देऊन आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमास उपस्थित असलेले मान्यवर

मा.दादाभाऊ केदारे
संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष
ग्राहक उपभोक्ता संरक्षण समिती
मा.उत्तमराव कांबळे
पत्रकार.साहित्यिक व जेष्ठ विचारवंत.मा.संपादक सकाळ
सौ.दुर्गाताई सुधीर तांबे
मा.नगरध्यक्षा संगमनेर तथा
चेअरमन SMBT
मा.विलास आण्णा शिंदे
उपमहापौर नाशिक
ॲड.प्रेरणा कुलकर्णी
माजी प्रभारी अध्यक्ष नाशिक जिल्हा ग्राहक आयोग
मा.दिपालीताई गणेश गिते
नगरसेविका नाशिक
मा.सुनिता सागर भोजने
नगरसेविका नाशिक
मा.राकेश जाधव
नगरसेवक ओझर नगरपरिषद
मा.मनिष सानप
सह आयुक्त अन्न प्रशासन नाशिक विभाग
मा.सुनिल सागळे
उपनियंत्रक नाशिक ग्रामीण
डॉ.नेहा शिरोरे
शिक्षण विस्तार अधिकारी नाशिक
मा.वैशाली राठोड
संचालिका राजराजेश्वरी मंगल कार्यालय नाशिक
सौ.निमसे मॅडम सामाजिक कार्यकर्त्या
मा.भाऊसाहेब जगताप
शिक्षण विस्तार अधिकारी नाशिक
डॉ.अविनाश झोटिंग
राष्ट्रीय सचिव
सौ.वैशाली जैन सामाजिक कार्यकर्त्या नाशिक
ॲड.हेमंत भंगाळे सर
ॲड.रघुनाथ सिंग कुशवाह
ॲड.सविता शिंपी
महाराष्ट्र राज्य कायदेशीर सल्लागार
मा.शिवलाल पगार सर
कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष
मुख्य आयोजक आर्कि.अक्षय कोठावदे.नाशिक जिल्हाध्यक्ष
संयोजक श्री.भागवत इरतकर
नाशिक शहर अध्यक्ष
सौ.चंद्रकला साबळे
नाशिक शहर अध्यक्षा कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले
सौ.रोहिणी जाधव राष्ट्रीय उपाध्यक्षा
मा.महेंद्र बेदमुथा राष्ट्रीय सहसंपर्कप्रमुख.
डॉ.अर्चना झोटिंग राष्ट्रीय कार्याध्यक्ष.सौ.माया पठाडे राष्ट्रीय निरिक्षक.सचिन पवार राष्ट्रीय संघटक. डॉ.प्रविणकुमार चव्हाण राष्ट्रीय मार्गदर्शक.
सौ.जान्हवी पाटील राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य.
श्री.रामचंद्र ताठे राज्य कार्याध्यक्ष. सौ.अंजली लाळगे
राज्य उपाध्यक्षा.कु.मिना पाटील राज्य निरीक्षक.योगेश निकम महाराष्ट्र राज्य सहसंपर्कप्रमुख.ॲड.शुभांगी कुलकर्णी.आर्क.रविंद्र घोडके.निलेश दुसे सर.भास्कर शेलार नाशिक जिल्हा मार्गदर्शक.
मा.बापूसाहेब ठाकरे उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष.सुरेखा धिवर .आरती खळदकर.
धनश्री शेळके नाशिक जिल्हा उपाध्यक्ष.आदि उपस्थित होते

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आले

यावेळी आभार प्रदर्शन ॲड. सविता शिंपी महाराष्ट्र राज्य कायदेशीर सल्लागार.रामचंद्र ताठे. राज्य कार्याध्यक्ष.सौ.अंजली लाळगे राज्य उपाध्यक्षा.यांनी मानले

# अरविंद कोठारी यांची राष्ट्रीय पत्रकार असोसिएशन ऑफ इंडिया (महाराष्ट्र) चे राज्य प्रभारी म्हणून नियुक्ती

महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार) दिवा (ठाणे) :** ठाणे येथील आरटीआय कार्यकर्ते अरविंद कोठारी, दैनिक हिंदी/मराठी वृत्तपत्राचे पत्रकार आणि दिवा बिझनेस असोसिएशनचे सदस्य, यांना राष्ट्रीय पत्रकार संघटनेतील त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन ही जबाबदारी देण्यात आली.

राष्ट्रीय पत्रकार असोसिएशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष जगदीश सिंह चंदेल यांच्या मार्गदर्शनाखाली आणि राष्ट्रीय प्रभारी भागवत द्विवेदी यांच्या संमतीने, संस्थेत एक वर्ष चांगले आणि कार्यक्षम काम केल्यानंतर त्यांची नियुक्ती करण्यात आली.

संघटनेच्या अधिकाऱ्यांनी आणि सहकाऱ्यांनी त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष ऋषिकेश त्रिपाठी, राहुल शर्मा प्रदेश प्रभारी ,अध्यक्ष, राजस्थान बाबूलाल योगी, प्रदेशाध्यक्ष, राजस्थान डॉ.अशोक चौहान, अध्यक्ष,उत्तर प्रदेश विनोद सिंह, प्रदेश प्रवक्ते, उत्तर प्रदेश राहुल राजा, प्रदेशाध्यक्ष उत्तराखंड



प्रल्हाद बरेथ, छत्तीसगड मध्यप्रदेश प्रदेशाध्यक्ष नरेंद्र सिंह, प्रदेशाध्यक्ष डॉ. दिनेश पांडे, विभागीय अध्यक्ष, जबलपूर, यांच्यासह मुंबईच्या कांग्रेस अध्यक्ष ,खासदार वर्षा गायकवाड, मुंबई कॉंग्रेसचे प्रवक्ते सुरेशचंद्र राजहंस, ठाणे जिल्हा पत्रकार नागेश पवार, नीलेश घाग, आर.सी, रावल, सामाजिक कार्यकर्ते अमोल केंद्रे, ठाणे महानगर पालिके चे ज्येष्ठ नगरसेवक मनोज शिंदे, माजी नगरसेवक एकनाथ भोईर, भाजप चे नगरसेवक सुरेश कांबले दिव्या चे नगरसेवक शैलेश पाटील, नगरसेवक एड.आदेश भगत, नगरसेवक सुहास देसाई, एमआईएम चे नगरसेवक सैफपठान,राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी चे ज़िला अध्यक्ष मनोज प्रधान,कॉंग्रेसचे प्रमुख प्रवक्ते राहुल पिंगळे, सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

# शेलगाव घुगे येथे वैज्ञानिक कंपोस्ट निर्मिती तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण यशस्वी

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी) :** दिनांक ४ मार्च २०२६ रोजी शेलगाव घुगे येथे कृषी विज्ञान केंद्र, वाशिम व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने "Compost Production Technology" या विषयावर प्रात्यक्षिकाधारित (Method Demonstration) प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमास डॉ. आर. एल. काळे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम; डॉ. भरत दशरथ गीते, प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन केंद्र, वाशिम; श्री. शशिकांत गोटे, कनिष्ठ संशोधन सहाय्यक; तसेच श्री. संदीप पी. गुट्टे, कृषी सहाय्यक उपस्थित होते.

डॉ. काळे यांनी कंपोस्ट निर्मिती तंत्रज्ञानाचे वैज्ञानिक पैलू स्पष्ट करताना सेंद्रिय अवशेषांचे कार्यक्षम व्यवस्थापन, कार्बन-नायट्रोजन (C:N) गुणोत्तर संतुलन,



आर्द्रता (60–65%) व तापमान (55–60°C) नियंत्रण, तसेच सूक्ष्मजीवांच्या साहाय्याने जलद व गुणवत्तापूर्ण कंपोस्ट निर्मिती याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी मृदास्वास्थ्य सुधारणा, सेंद्रिय कार्बन वाढ, सूक्ष्मअन्नद्रव्यांची उपलब्धता आणि रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी कंपोस्ट तंत्रज्ञानाचा अवलंब करणे अत्यावश्यक असल्याचे नमूद केले.

डॉ. भरत गीते यांनी जमिनीची भौतिक, रासायनिक व जैविक सुपीकता वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांनी सेंद्रिय घटकांचा जास्तीत जास्त वापर करण्याची गरज अधोरेखित केली.

या वेळी श्री. विठ्ठल घुगे यांच्या शेतामध्ये प्रत्यक्ष मेथड डेमॉन्स्ट्रेशन आयोजित करण्यात आले. या प्रात्यक्षिकात विद्यापीठ मान्यताप्राप्त कंपोस्ट कल्चर, ट्रायकोडर्मा जैवप्रतिरोधक बुरशी तसेच गोकृपा अमृत कल्चर यांच्या वापरातून सेंद्रिय कच्च्या अवशेषांचे प्रभावी जैवअपघटन (Bio-decomposition) कसे



करावे याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तज्ज्ञांनी कंपोस्ट कल्चरच्या माध्यमातून जलद कुजविण्याचे तांत्रिक महत्त्व, रोगनियंत्रणातील भूमिका व उत्पादनक्षमतेवरील सकारात्मक परिणाम याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन श्री. शशिकांत गोटे यांनी केले तर आभारप्रदर्शन श्री. संदीप पी. गुट्टे यांनी केले. कार्यक्रमास परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते व त्यांनी वैज्ञानिक कंपोस्ट निर्मिती तंत्रज्ञानाबाबत समाधान व्यक्त केले.

# कला व वाणिज्य महाविद्यालय बोरी येथे मराठी भाषा गौरव दिन साजरा

महाराष्ट्र जीत

**प्रशांत ठाणे/दारव्हा :** स्थानिक कला व वाणिज्य महाविद्यालय बोरी अरब येथे मराठी विभागाद्वारे आयोजित मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रा. क. स. राठोड हे उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिलीप खुपसे हे होते.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्रा. राठोड सर यांनी कवी कुसुमाग्रज यांच्या साहित्याचा आढावा घेऊन मराठी भाषेतील कुसुमाग्रजांचे योगदान आपल्या कवितेतून व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात डॉ खुपसे सर यांनी कुसुमाग्रज यांच्या कणा, कोलबसचे गर्वगीत या कविता सादर




करून कुसुमाग्रजांचा जीवनपट विद्यार्थ्यांसमोर मांडला.

याप्रसंगी मायमराठीचा गौरव म्हणून काव्यवाचन कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये प्रा. आकाश सूर्यवंशी, कु. साक्षी तिजारे, कु ज्ञानेश्वरी राऊत, जय तायडे, कृष्णा घरडीणकर, अथर्व बोरकर, कू महिमा बागोकर यांनी सहभाग घेऊन काव्यवाचनातून रसिकांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नंदकुमार भाकरे यांनी, सूत्रसंचालन प्रा.सोपान चचाने यांनी तर आभार प्रा. सिद्धार्थ चंदनखेडे सर यांनी मानले.

मंचावर यावेळी डॉ. सुनील ढेरे, डॉ.दीपक कुटे, प्रा. प्रकाश तेलगोटे हे उपस्थित होते. कार्यकमारीता डॉ गणेश पवार, डॉ.विजय खोब्रागडे, डॉ.सुजाता नाईक, प्रा. भीमजियानी मॅडम, प्रा. राहुल वानखडे व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते..

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

दैनिक महाराष्ट्र जीत
गुरुवार, ०५ मार्च २०२६



# महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

## छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा 1 चे आयोजन

### तहसील कार्यालय, माहूर द्वारे आयोजित अधिकृत अभियान

महाराष्ट्र जीत

**श्रीक्षेत्र माहूर/सुभाष खडसे :** महसूल व वन विभागाची सर्व कामे एकाच छताखाली व्हावी यासाठी महाराष्ट्र शासनाकडून शासन निर्णय महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. मराअ-2026 प्र.क्र.01 समन्वव-1, दिनांक 18/02/2026.लोकाभिमुख प्रशासन

महसूल विभागाच्या सेवा नागरिकांच्या दारी पोहोचवून प्रशासन अधिक गतिमान करणे.

नागरिकांच्या दैनंदिन महसूल विषयक तक्रारींचे एकाच ठिकाणी तात्काळ निवारण करणे.7/12 डिजिटल 7/12, 8अ उतारे आणि सिंगल डे सर्विस डिलिव्हरी प्रणालीचा प्रभावी वापर करणे. यासह इतर सुविधांचा समावेश असल्याने या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन तहसीलदार अभिजीत जगताप यांनी केले आहे महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी राहुल कर्डिले सहायक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तूला यांच्या मार्गदर्शनाखाली माहूर तहसील



कार्यालय अंतर्गत वानोळा सिंदखेड वाई बाजार माहूर या चार मंडळात हे शिबिर होणार आहे वानोळा येथे दि 7. 3.2026 रोजी सिंदखेड येथे दि 14.3.2026 रोजी वाई बाजार येथे दि 10.4.2026 रोजी आणि माहूर येथे 8.5.2026 रोजी या भव्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे

या शिबिरात महसूल दस्तऐवज महसूल दस्ताऐवज प्रलंबित फेरफार निकाल, 7/12दुरूस्ती, डिजिटल 7/12व 8अ उतारा वितरण.लोकसेवा हक्क दाखले उत्पन्न रहिवासी, जात आणि नॉन-क्रीमी लेयर प्रमाणपत्रे.सिंगल विंडो प्रणाली एकाच ठिकाणी अर्ज स्वीकारणे, पडताळणी आणि तात्काळ सेवा वितरण. यासह विविध सेवा देण्यासाठी तहसीलदार व नायब तहसीलदार पर्यवेक्षण, समन्वय आणि शिबीर प्रभारी मंडळ अधिकारी व तलाठी स्थानिक नियोजन अर्ज स्वीकारणे, कागदपत्रांची पडताळणी आणि सेवा अद्ययावत करणे.




सनियंत्रण व अहवाल डॅशबोर्ड प्रपत्र अ-1 ते अ-6अधिकृत अहवाल नमुना फेरफार निकाली काढणे, 7/12 दुरूस्ती अर्ज, डिजिटल 7/12 वितरण आणि प्रमाणपत्र वितरणाचा दैनंदिन प्रगती अहवाल. सादर होणार आहे

त्यामुळे नागरीकानी आवश्यक कागदपत्रांसह आपल्या संबंधित मंडळाच्या शिबीराच्या दिवशी आवश्यक मूळ कागदपत्रे व छायांकित प्रतींसह वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन तहसीलदार अभिजीत जगताप यांनी केले आहे

# पांगरी न. येथे वासुदेवाच्या वारीतून जलसंवर्धन, वृक्षारोपण व स्वच्छतेचा संदेश

## "वासुदेवाच्या वेशभूषेतून प्रदिप पट्टेबहादूर यांनी केले ग्रामस्थांचे प्रबोधन"

महाराष्ट्र जीत

**मालेगाव / सुरज अवचार :-** तालुक्यातील पांगरी नवघरे येथे रामराव झनक कला, वाणिज्य महाविद्यालय मालेगाव राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) विभागामार्फत विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरादरम्यान विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.

या वेळी युवा सामाजिक कार्यकर्ते तथा जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त युवा कलाकार प्रदीप पट्टेबहादूर यांनी पारंपरिक वासुदेवाच्या वेशभूषेतून ग्रामस्थांमध्ये जनजागृती केली. वासुदेवाच्या वारीच्या माध्यमातून त्यांनी जलसंवर्धन, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान तसेच "लेक वाचवा" या महत्त्वपूर्ण विषयांवर प्रभावी संदेश दिला.

ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत जलसाठा जपणे, प्रत्येक घरासमोर किमान एक झाड लावणे आणि गाव स्वच्छ ठेवण्याचा मानस मनी जोपसू असे सांगितले. पारंपरिक लोककलेच्या माध्यमातून सामाजिक संदेश देण्याच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले.

शिबिरामध्ये स्वयंसेवकांनी गावात स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण तसेच पाणी अडवा-पाणी जिरवा याबाबत जनजागृती केली. कार्यक्रमास ग्रामस्थ, विद्यार्थी, उपस्थित होते. या वासुदेव च्या वारीला राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी






प्रा . डॉ . दिपक जमधाडे यांनी प्रास्ताविक भाषण केले . सूत्रसंचालन प्रा . डॉ . भिमराव जांभरुणकर यांनी केले तर आभार प्रदर्शन राजेश्वर उगलमुगलेने केले . कार्यक्रमाला प्रा. डॉ लता जावळे, प्रा .डॉ .उषा गौरकर व रासेयो स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते .पथनाट्यामध्ये गटप्रमुख कु . आचल बोरचाटे, कु . नम्रता बोरचाटे, कु . स्नेहल भगत , कु . आरती राजगुरे, कु प्रियंका इंगळे , कु . सुनिता पठाडे यांनी सहभाग घेतला

या उपक्रमामुळे पांगरी नवघरे येथे सामाजिक जाणीव जागृत होऊन ग्रामविकासासाठी सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# नागरिकांनी 'सहायता' पोर्टलवर माहिती नोंदवावी – आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन

■ आखाती देशांतील उद्‌भवलेल्या युद्धपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासन सतर्क

■ राज्य आपत्ती संचालन केंद्र येथे भेट देऊन घेतला आढावा

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** आखातातील नऊ देशांमध्ये युद्धाचा भडका उडाल्यामुळे तेथील परिस्थिती गंभीर बनली असून महाराष्ट्र शासनाने या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली, अडकलेल्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व त्यांच्या मदतीसाठी सर्व आवश्यक यंत्रणा सज्ज करण्यात आल्या आहेत, अशी माहिती जलसंपदा (विदर्भ, तापी,कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. मंत्रालयातील राज्य आपत्ती संचालन केंद्र (एसईओसी) येथे उपस्थित राहून मंत्री महाजन यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी राज्य आपत्ती संचालन केंद्राचे संचालक डॉ भालचंद्र चव्हाण,



अपर सचिव श्री. परदेशी, दत्तात्रय कदम, व्यवस्थापक विशेषकर सूर्यवंशी, सल्लागार श्रीधर कामत उपस्थित होते. आखाती देशांमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांची अचूक माहिती मिळावी, त्यांच्याशी थेट संपर्क साधता यावा आणि गरज पडल्यास तातडीने मदत पोहोचवता यावी, यासाठी शासनाने विशेष ऑनलाइन पोर्टल विकसित केले आहे.

https://geospatial.mahaseoc.in/Sahay-ata_gulf/ या 'सहायता' पोर्टलवर संबंधित नागरिकांनी किंवा त्यांच्या नातेवाईकांनी आवश्यक माहिती भरावी, असे आवाहन मंत्री महाजन यांनी केले आहे.या माध्यमातून शासनाला अडकलेल्या व्यक्तींचे स्थान, संपर्क क्रमांक, प्रवासाचा तपशील इत्यादी माहिती तात्काळ उपलब्ध होणार असून मदतकार्य अधिक प्रभावीपणे राबविणे शक्य होईल.

उपलब्ध माहितीनुसार, विविध विमानसेवांद्वारे महाराष्ट्रात परत येणाऱ्या प्रवाशांची नोंद घेतली जात आहे. मुंबई विमानतळावर मोठ्या संख्येने प्रवासी राज्यात दाखल झाले असून त्यांच्या सुरक्षिततेची व आवश्यक सोयींची व्यवस्था करण्यात आली आहे. आरोग्य तपासणी, निवास आणि पुढील प्रवासासाठी समन्वय साधण्याचे काम संबंधित विभागांकडून सुरू आहे."राज्यातील एकही नागरिक परदेशात अडचणीत राहू नये, ही शासनाची भूमिका आहे. केंद्र सरकारशी सातत्याने संपर्क ठेवून आवश्यक ती समन्वयात्मक पावले उचलली जात आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि अधिकृत माहितीसाठी शासनाच्या संकेतस्थळांवर व अधिकृत माध्यमांवरच विश्वास ठेवावा," असे मंत्री महाजन यांनी स्पष्ट केले. आपत्ती व्यवस्थापन विभाग, परराष्ट्र व्यवहार विभाग तसेच इतर संबंधित यंत्रणा समन्वयाने कार्यरत असून परिस्थितीवर सतत नजर ठेवण्यात येत आहे.

आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यास शासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

### उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनात महिला सुरक्षिततेवर उच्चस्तरीय बैठक

# सेफ्टी ऑडिट अहवालाचा आढावा; पॅनिक बटण व्हॉट्सॲपशी जोडण्याचे व स्कूल बस शाळेच्या आवारातच उभ्या करण्याचे निर्देश

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भात करण्यात आलेल्या राज्यव्यापी सेफ्टी ऑडिटचा आढावा घेण्यासाठी विधानभवनात उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक पार पडली. बदलापूर येथील अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराची घटना आणि स्वारगेट बसस्थानकावरील प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक आयोजित करण्यात आली. स्वयंसेवी संस्थांमार्फत राज्यातील २४२ ठिकाणी करण्यात आलेल्या सेफ्टी ऑडिटमधील शिफारशी तातडीने आणि निश्चित कालमर्यादेत अंमलात आणाव्यात, असे स्पष्ट निर्देश उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी प्रशासनाला दिले.

बस स्थानके, रेल्वे स्थानके व सार्वजनिक वाहतुकीशी संबंधित ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून सीसीटीव्ही, प्रकाश व्यवस्था, महिला पोलिसांची गस्त, हेल्पलाईन, पॅनिक बटण, स्वच्छतागृहे, तक्रार नोंदणी प्रणाली आणि 'हिरकणी कक्ष' यांची स्थिती तपासण्यात आली. अनेक सुविधा अस्तित्वात असूनही त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे अहवालात



नमूद करण्यात आले. विशेषतः पॅनिक बटण प्रणाली कार्यक्षम नसल्याचे आढळल्याने ती नियंत्रण कक्षाशी तसेच व्हॉट्सॲप क्रमांकाशी थेट जोडण्याचे निर्देश देण्यात आले, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत महिलांना त्वरित मदत मिळेल.

डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देत शालेय बस चालक व कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देणे, बसस्थानकांवर सीसीटीव्ही संदर्भातील स्पष्ट फलक लावणे, पॅनिक बटणाविषयी जनजागृती वाढवणे आणि शाळांनी बस शाळेच्या आवारातच उभ्या करण्याची व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे सांगितले. पीडित मुलींना शासकीय योजनांचा लाभ मिळतोय का याची पडताळणी करून आवश्यकतेनुसार समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, असेही त्यांनी नमूद केले. असंघटित क्षेत्रातील महिला कामगारांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र उपाययोजना आखून त्यांच्या नोंदीसाठी विशेष ॲप विकसित करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. तसेच वन स्टॉप क्रायसिस सेंटरचा नियमित आढावा घेऊन प्रत्यक्ष लाभार्थींना मदत मिळते का याचे मूल्यमापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

परिवहन विभागाने ६३३ ठिकाणी सीसीटीव्ही बसविल्याची माहिती दिली असून प्रत्येक बसस्थानकावर सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आल्याचे सांगितले. शालेय बसमध्ये महिला सहाय्यक नेमणे बंधनकारक करण्यात आले असून लवकरच सर्व बसमध्ये सीसीटीव्ही, जीपीएस आणि पॅनिक बटण प्रणाली अनिवार्य करून ती पोलीस विभागाशी जोडण्यात येणार आहे. पोलीस विभागाने शाळा सुटण्याच्या वेळेत गस्त वाढवली असून प्रत्येक पोलीस चौकीत 'भरोसा सेल' कार्यरत असल्याचे स्पष्ट केले.

बैठकीस अपर पोलीस महासंचालक अश्वती दोर्जे, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, उपसचिव (शालेय शिक्षण) तुषार महाजन, कामगार कल्याण आयुक्त भास्कर मोराडे, उपायुक्त (महिला व बाल कल्याण) राहुल मोरे तसेच एसटी महामंडळाचे सुरक्षा व दक्षता अधिकारी श्री. तिकोटकर, स्त्री मुक्ती परिषदेच्या शारदा साठे आदी उपस्थित होते. स्त्री मुक्ती परिषद व स्त्री आधार केंद्राने सेफ्टी ऑडिट म्हणजेच महिला सुरक्षेचा लेखाजोखा यावर १० फेब्रुवारी २६ रोजी भेटून कार्यवाहीची विनंती केली होती.

बैठकीच्या शेवटी प्रत्येक बसस्थानकावर महिला कर्मचाऱ्यांची नेमणूक करून स्वतंत्र मदत केंद्र सुरू करण्याचे, रेल्वे व एसटीसाठी स्वतंत्र दक्षता समित्या स्थापन करण्याचे आणि स्वच्छतागृह व 'हिरकणी कक्ष' यांची नियमित तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले. उपसभापती कार्यालयामार्फत स्वतंत्र महिला सुरक्षा समिती स्थापन करून सेफ्टी ऑडिटमधील सर्व शिफारशींची टप्प्याटप्प्याने काटेकोर अंमलबजावणी केली जाईल, असे उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले.

# शरद पवार ८५व्या वर्षी पुन्हा राज्यसभेवर जाणार; महाविकास आघाडीचा पाठिंबा

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** ८५ वर्षीय शरद पवार हे संसदीय राजकारणात यापुढंही सक्रीय राहणार की निवृत्त होणार? याची उत्सुकता होती. पण आता अखेर शरद पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं आहे. १९६० साली महाराष्ट्र विधानसभेत प्रथमच आमदार म्हणून निवडून आल्यापासून आजपर्यंत सातत्यानं लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत राहण्याची कामगिरी शरद पवार यांनी केली आहे. अशी सलग संसदीय कारकीर्द असलेले ते देशातील अग्रगण्य नेत्यांपैकी एक मानले जातात. राज्यसभेच्या माध्यमातून पुढची ६ वर्षे शरद पवार हे राज्यसभेवर काम करतील. या निर्णयामुळं राजकीयदृष्ट्या महाविकास आघाडी एकत्र राहील असं नेत्याचं म्हणणं आहे.

**महाविकास आघाडीकडून शरद पवार यांचं नाव जाहीर :** महाराष्ट्रातील ७ उमेदवार राज्यसभेवर निवडून जाणार आहेत. त्यापैकी महायुतीचे ६ आणि महाविकास आघाडीचा एक उमेदवार निवडून येईल. भाजपाकडून केंद्रीय मंत्री रामदास आठवले, भाजपाचे नेते विनोद तावडे, नागपूरच्या माजी महापौर माया चिंतामण इवनाते आणि रामराव वडकुते यांची नावं जाहीर करण्यात आली आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून दिवंगत नेते अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांचं नाव जाहीर करण्यात आलं आहे. शिवसेनेकडून अद्याप नाव जाहीर झालेलं नाही. तर महाविकास आघाडीकडून शरद पवार यांचं नाव जाहीर करण्यात आलं आहे. त्यामुळं शरद पवार यांचं नाव आल्यामुळं ही निवडणूक बिनविरोध होणार असल्याचं सांगण्यात येतं. अन्यथा भाजपाकडून ८वा उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याची तयारी करण्यात आली होती.

**काँग्रेस आणि शिवसेनेची (उबाठा) मनधरणी :** शरद पवार यांच्या नावाला काँग्रेसचा विरोध होता. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी पक्षाचं विलीकरण होणार, असं नेत्यांकडून सांगण्यात येत होतं. अजित पवार हयात असताना या चर्चा अंतिम टप्यात असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्यांनी सांगितलं होतं. त्यानंतर शरद पवार यांच्या नावाची राज्यसभेसाठी चर्चा सुरु झाली. पण, विलीनीकरणाबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं आपली भूमिका स्पष्ट करावी, मग आम्ही यावर बोलू अशी भूमिका काँग्रेसनं घेतली होती.

**विलीनीकरणाची चर्चा पूर्णपणे थांबली :** आज शरद पवार यांचं नाव जाहीर होण्याआधी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी विधानभवनात बोलताना म्हटलं की, "राजसभेच्या जागेची निवडणूक करायची आहे. महाविकास आघाडीच्या बाबतीत सर्वांनी उमेदवार करावा. अजितदादांच्या निधनानंतर विलीनीकरणाची चर्चा पूर्णपणे थांबली आहे. आता ही चर्चा पुढं नेणं शक्य नाही. आम्ही याबाबत कुणाशीही कोणतीही चर्चा करत नाही. दोन्ही बाजूंच्या भावना समजून घेऊन निर्णय घेणारे नेतृत्व सध्या नसल्यामुळं विलीनीकरणाचा विषय पूर्णतः बाजूला पडला आहे. पुढं विलीनीकरणाची कोणतीही शक्यता नाही," असं त्यांनी स्पष्ट केलं.

**पेच सोडवण्यासाठी उद्धव ठाकरे यांची भेट :** दरम्यान, राज्यसभेची ही जागा शिवसेनेची आहे, असं आदित्य ठाकरे यांनी म्हटलं होतं. पण दुसरीकडे शरद पवार हे राज्यसभेसाठी इच्छुक असल्याचं संजय राऊत यांनी म्हटलं होतं. त्यामुळं आदित्य ठाकरे विरुद्ध संजय राऊत यांच्या बोलण्यातला विसंवाद असल्याचं दिसून आलं होतं. तर मंगळवारी ष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे आणि जयंत पाटील यांनी आगामी राज्यसभा निवडणुकीतील पेच सोडवण्यासाठी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली.

# संभाजीनगर भिमटेकडी येथील जागतीक धम्म परिषदेची सांगतेच्या उद्धाटनात; बौध्दगया येथे 10 एकरात विश्रामगृह ,देशवंडी येथे वामनदादा कर्डकांच्या स्मरकासाठी 100 कोटी तर चवदार तळ्यासाठी 53 कोटी - पालकमंत्री संजय शिरसाठांची घोषणा

## (जागतीक धम्म परिषदेची 2 मार्चला सांगता; महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे यासह 23 ठराव मंजूर)

महाराष्ट्र जीत

**बुलडाणा, (प्रतिनिधी)-** छत्रपती संभाजीनगर येथील विश्वशांती विहार भिमटेकडी जटवाडा येथील 26 फेब्रुवारी ते 2 मार्च पाच दिवस चालू असलेल्या जागतिक दुसऱ्या धम्मपरिषदेच्या सांगता 2 मार्च रोजी सांगता समारंभाचे उद्धाटन महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा संभाजीनगर (औरंगाबाद) चे पालकमंत्री संजयजी शिरसाठ यांच्या हस्ते झाले प्रमुख पाहूने म्हणून विजयाताई संजय शिरसाठ, स्वागताध्यक्ष भंत्ते सुगतशांती महाथेरो,माजी महापौर नंदकुमार घोडले,आंबेडकरी चळवळीचे पॅंथर रमेशभाई खंडागळे, विकास जैन, पत्रकार गणेश दादा सुरडकर, पत्रकार भारत शिंदे, पत्रकार बाबासाहेब जाधव यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम भगवान गौतम बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन केले यावेळी समारोप सत्रात उद्घाटन प्रसंगी बोलतांना पालकमंत्री शिरसाठ यांनी या भव्य जागतीक धम्म परिषदेसाठी आर्याजी माता भंदन्त प्राध्यापीका धम्मदर्शना महाथेरो व त्यांच्या कोअर कमिटीने घेतलेल्या परिश्रमाचे कौतुक केले.एक दिवसाचा कार्यक्रम घेण्यासाठी राजकीय लोक नेते घाबरतात; पण मात्र पाच दिवसांची जागतीक धम्मपरिषद नियोजित बध्द यशस्वीपणे आयोजित करून माताजी महाथेरनी प्रा.धम्मदर्शना यांनी नवा आदर्श निर्माण केला. असे म्हटले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्यघटनेमुळे माझ्या सारख्या सामान्य मानसाला मंत्री होण्याची संधी मिळाली आज जो मी तूमच्या पूढे उभा आहे तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या





मुळेच दिसत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत असत की, “शासन करती जमात व्हा “ या सुवर्ण संधीचा उपयोग समाजाच्या उन्नतीसाठी करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. समाजाने आता केवळ मागणाऱ्यांची नव्हे, तर देणाऱ्याची भूमिका घ्यावी. यावेळी त्यांनी घोषणा केली की, जगातील बौद्धांचे श्रद्धास्थान असलेल्या बुद्धगया येथे महाराष्ट्रतून दरवर्षी लाखो उपासक उपासिका व भिक्खू, भिक्खूनी संघ जातात मात्र, त्यांना राहण्यासाठी अडचण येवू नये म्हणून 1 मे रोजी भेट देऊन 10 एकर जागा निश्चित करून महाराष्ट्रातील भाविकांसाठी भव्य सर्वसुखसोईनी सुसज्य असे भव्य दिव्य विश्रामगृह उभारण्यात येणार, सामाजिक न्याय विभागाच्या वतीने 8 मार्च रोजी लोककवी वामनदादा कर्डक यांचे जन्मस्थान असलेले देशवंडी जिल्हा नाशिक या मळ गावी 100 कोटी रूपयाच्या भव्य दिव्य स्मारकाचे भूमिपूजन होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली, याशिवाय 53 कोटी रूपये खर्चून चवदार तळयाचा विकास करून तेथील पाणी पिण्यासाठी करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगीतले. छत्रपती संभाजीनगर विश्वशांती विहार समीतीच्या आयोजित भिमटेकडी येथील जगातील दुसऱ्या पाचदिवस चाललेल्या धम्मपरिषदेस माझ्या स्वतःकडून 10 लाख व उद्या परवा माझ्या खात्याकडून 20 लाख देण्याची उद्घाटन प्रसंगी केली मी जे बोलतो तेच करतो निव्वळ आश्वासन देऊन वेळ निभावत नाही.

आर्याजी प्राध्यापीका धम्मदर्शना महाथेरो यांनी प्रस्तावित भीम टेकडीच्या विकासकामांची माहिती दिली. परिषद आयोजनातील अडचणी व त्यावरील मात यांचा उल्लेख करतांना त्यांनी पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याची दखल घेतली. या या परिषदेला अभूतपूर्व प्रतिसादातून समाज बुध्दांच्या मार्गांवर दृढपणे वाटचाल करित असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे 2029 मध्ये सातवी जागतीक धम्म संगती याच ठीकाणी जगभरातील बौध्द भिक्खूंना निमंत्रित करण्यात येणार असल्याची घोषणा केली.

या शेवटच्या दिवसाच्या दिवसी समारोपनात जागतिक धम्म परिषदेची सांगता करून; महाबोधी विहार बौध्दांच्या ताब्यात द्यावे यासह 23 ठराव मंजूर करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सुत्र संचलन प्रा.समाधान इंगळे, यांनी केले, तर आभार प्रदर्शन अनिलकुमार बस्ते यांनी केले.

# लाईनमन' हा शब्द नाही, तर जिद्दीचे प्रतीक;

## नागपूरच्या दिपाली खोब्रागडे यांचा दिल्लीत होणार राष्ट्रीय गौरव

महाराष्ट्र जीत

**नागपूर** : आज 'राष्ट्रीय लाईनमन दिना'चे औचित्य साधत महावितरणच्या नागपूर विभागातून एक अत्यंत प्रेरणादायी बातमी समोर आली आहे. महाल विभागामध्ये वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून कार्यरत असलेल्या दिपाली खोब्रागडे यांची 7 मार्च रोजी नवी दिल्ली येथे आयोजित विशेष सोहळ्यात राष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यासाठी निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी महाराष्ट्रातून निवडल्या गेलेल्या चार कर्मचाऱ्यांमध्ये दिपाली खोब्रागडे या एकमेव महिला आहेत. त्यांच्या या यशाने महावितरणचा मान उंचावला असून, ही कामगिरी संपूर्ण विभागासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

या यशाचे सेलिब्रेशन करण्यासाठी आज नागपूर परिमंडल कार्यालयातर्फे काटोल रोडस्थित 'विद्युत भवन' येथे सत्कार सोहळा पार पडला. यावेळी



मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या हस्ते दिपाली यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन विशेष गौरव करण्यात आला. यावेळी अधीक्षक अभियंता अमित परांजपे व संजय वाकडे, कार्यकारी अभियंता महेश चतुर्वेदी, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने यांच्यासह विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती होती.आपल्या गौरव सोहळयाला उत्तर देताना दिपाली खोब्रागडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या म्हणाल्या, "लाईनमन हे केवळ एक पद आहे, ते लिंगावर आधारित नाही. लाईन हेल्परपासून मुख्य अभियंत्यापर्यंत प्रत्येक कर्मचारी हा महावितरणचा एक 'लाईनमन'च आहे. मला सुरुवातीपासूनच काहीतरी आव्हानात्मक करण्याची ओढ होती. सुरक्षिततेच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी हीच माझी खरी शक्ती आहे. जोखमीचे काम हाती घेण्यापूर्वी काही क्षण केलेली मानसिक तयारी मला अधिक आत्मविश्वास देते." कुटुंबाची साथ आणि सहकाऱ्यांचे सहकार्य याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. ग्राहकांकडून मिळणारा आदर हा भीतीचे सावट दूर करणारा असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच, ग्राहकांनी वीज सुरक्षिततेबाबत अधिक साक्षर राहणे ही काळाची गरज असल्याचे सांगत, तरुणांना जिद्दीने या क्षेत्रात येण्याचे आवाहन त्यांनी केले.मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी दिपाली खोब्रागडे यांच्या कामगिरीचे तोंडभरून कौतुक केले. हा गौरव केवळ नागपूर परिमंडळाचा नसून संपूर्ण महावितरणचा असल्याचे सांगत त्यांनी दिपाली यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात विद्यापीठ समन्वयकांची दमदार उपस्थिती!

महाराष्ट्र जीत

**चिखली तालुका प्रतिनिधी** : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ सलग्न श्री गजानन महाराज कृषी व शैक्षणिक संस्था संचलित समर्थ कृषी महाविद्यालय, देऊळगाव राजा येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) सात दिवसीय विशेष शिबिराला मा. डॉ. संदीप हाडोळे (विद्यार्थी कल्याण अधिकारी तथा विद्यापीठ समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना) यांची सदिच्छा भेट लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे शिबिराला विशेष उर्जा आणि प्रेरणेची जोड मिळाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन मेहेत्रे सर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संदीप हाडोळे सर उपस्थित होते. यावेळी प्रा. सोळंकी सर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. चगदळे सर तसेच विद्यार्थी प्रतिनिधी निखिल धंदरे यांची उपस्थिती कार्यक्रमाला लाभली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.




नितीन मेहेत्रे यांनी करत शिबिराच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला. त्यानंतर डॉ. संदीप हाडोळे यांनी स्वयंसेवकांशी थेट संवाद साधत राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व अधोरेखित केले.

स्वयंसेवकांनी शिबिरादरम्यान राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचे त्यांनी मनापासून कौतुक केले व पुढील

> “राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ शिबिरापुरती मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि समाजाशी घट्ट नाते निर्माण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची चळवळ आहे. स्वयंसेवकांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून कार्य करावे.”
>
> – डॉ. संदीप हाडोळे

वाटचालीसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांच्या भेटीमुळे स्वयंसेवकांचा उत्साह द्विगुणित झाला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल इंगळे व कल्याणी गरड यांनी उत्कृष्टरीत्या केले. शिबिरातील विविध उपक्रमांचा अभिप्राय शंकर देवकर व शितल सोमनकर यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शंकर देवकर यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आणि उत्तम नियोजनासह पार पडला.

# मोबाईल हिसकावला

महाराष्ट्र जीत

**नवीन पनवेल वार्ताहर :** पायी चालणाऱ्या 41 वर्षीय इसमाकडील मोबाईल हिसकावून अनोळखी ईसम मोटरसायकल वरून पसार झाला. या प्रकरणी 2 मार्च रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.मंगेश सुखसे हे सेक्टर चार, करंजाडे येथे राहत असून ते दोन मार्च रोजी सकाळी साडेपाचच्या सुमारास वडाळे तलाव, पनवेल येथे चालण्यासाठी गेले होते. यावेळी त्या ठिकाणी ते कट्टयावर बसले. काळया रंगाची केटीएम मोटरसायकल वरून अनोळखी इसम त्यांच्या जवळ आला आणि त्यांच्या हातातील 70 हजार रुपये किमतीचा मोबाईल खेचून तो पळून गेला.

# साहित्य क्षेत्रातील अशोकराव टाव्हरे यांचे योगदान उल्लेखनीय – डॉ. श्रीपाल सबनीस

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** पद्मश्री नामदेवराव ढसाळ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सतत तीन वर्षे कनेरसर, मुंबई , राजगुरुनगर येथे साहित्य संमेलन आयोजित करून विविध क्षेत्रात कार्यरत राहून साहित्यासाठी कवी-लेखक अशोकराव टाव्हरे हे उल्लेखनीय योगदान देत आहेत असे मत ज्येष्ठ साहित्यिक व ८९ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी तिसऱ्या पद्मश्री नामदेवराव ढसाळ स्मृती साहित्य संमेलनाच्या उद्धाटनप्रसंगी व्यक्त केले. दोन कवितासंग्रह, लेखसंग्रह, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी



यांच्या कार्यावर मराठी व इंग्रजीत पुस्तकांचे लेखन, अनेक स्मरणिका व विशेषांकाचे संपादन करून अशोकराव टाव्हरे हे प्रतिभावंत साहित्यिक म्हणून नावारूपास येत आहेत. समाजाच्या विविध क्षेत्रात कार्यरत राहण्याचे टाव्हरे यांचे कसब व त्यांची पत्नी सुरेखा टाव्हरे यांची त्यांना असलेली साथ गेली तीन वर्षे साहित्य संमेलनात अनुभवत आहे असे डॉ. श्रीपाल सबनीस यांनी नमुद केले.

# स्वीकृत नगरसेवक पदी प्रथमेश सोमण यांच्या नावावर शिक्कामोर्तब!

महाराष्ट्र जीत

**पनवेल प्रतिनिधी :** शिवसेनेचे महानगरप्रमुख आणि पक्षाचे पनवेल मधील तरुण सुशिक्षित नेतृत्व ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांच्या नावावर अखेर शिक्कामोर्तब झाले आहे. प्रथमेश सोमण यांनी आज शिवसेना पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आपला नामनिर्देशन अर्ज दाखल केला. पक्षाचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच स्वतः आमदार प्रशांत ठाकूर यांना फोन करून प्रथमेश सोमण यांच्या नावाची सूचना केल्यावर इतर उलट सुलट चर्चांनाही पूर्णविराम लागला. आपल्या कार्यकर्त्याला दिलेला शब्द पूर्ण करत पनवेलकरांना एक उच्चशिक्षित लोकप्रतिनिधी दिल्याने कार्यकर्त्यांनी एकनाथ शिंदे व खासदार बारणे यांचे आभार मानले. प्रभाग १८ मध्ये त्यांनी हक्काची दावेदारी सोडल्यापासून महायुतीचे समन्वयक म्हणून महापालिका निवडणुकीत जबाबदारी पार पाडली. याशिवाय वर्षानुवर्षे शिवसेना पक्षात विविध पदे भूषवून तथा माजी नगरसेवक म्हणून काम केलेल्या व प्रशासनाचा अनुभव असणाऱ्या प्रथमेश सोमण यांच्या नावाचीच चर्चा पहिल्या दिवसापासून



होती. निवडणुकीच्या प्राथमिक जागा वाटपाच्या चर्चेतच त्यांच्या नावावर खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी शिक्कामोर्तब केले होते. ड्युअल टॅक्स, मालमत्ता कर, डायलिसिस सेंटर, आरक्षित जातींच्या स्कॉलरशिप चा प्रश्न, हॉकर्स लायसन्स, राम मंदिर उद्धाटनाच्या वेळेस उद्भवलेला हिंदू मुस्लिम हिंसेचा प्रश्न, प्रदूषणाच्या प्रश्न पनवेल रेल्वे स्थानकातील रिक्षा युनियनची बांधणी, कामगार युनियनच्या माध्यमातून कामगारांचे प्रश्न, धर्मवीर चित्रपटाचे भव्य प्रीमियर्स, कोविड काळात गणपती विसर्जनाची राबवलेली अभिनव पद्धत, यासह लोकसभा विधानसभा निवडणुकीमध्ये शिवसेना-भाजप महायुतीचे कोर कमिटीचे सदस्य आणि जबाबदार पदाधिकारी म्हणून महत्त्वाच्या भूमिका पार पाडल्या आहेत. गरीब विद्यार्थिनींसाठी सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन चा अभिनव उपक्रम सोमण यांनी राबवला असता या संकल्पनेवर खुश होऊन स्वतः एकनाथ शिंदे यांनीच वैयक्तिक दहा लाख रुपयांची मदत सोमण यांना या योजनेसाठी दिली, तर धर्मवीर चित्रपटाच्या प्रीमियर वेळेसही प्रत्यक्ष न येता ही एकनाथ शिंदे व्हिडिओ कॉल च्या माध्यमातून सोमण यांच्या कार्यक्रमाला उपस्थित राहिले. महापालिका , पोलीस, महसूल अशा प्रशासकीय खात्यांमध्येही प्रथमेश सोमण यांची असलेली सामाजिक पकड व स्वच्छ प्रतिमा ही जमेची बाजू आहे. एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय म्हणून तथा अनेक पक्षप्रवेश करत पक्ष संघटना मजबूत केलेल्या प्रथमेश सोमण यांच्या गळयात नगरसेवक पदाची माळ पडणार असून त्याबद्दल संघटनेतील सर्वच पदाधिकाऱ्यांनी एकमुखी पाठिंबा देत आनंद व्यक्त केला आहे. "सभागृहात शिवसेनेकडून एक अभ्यासू आणि प्रश्नांची जाण असलेला शिवसैनिक म्हणून प्रथमेशचेच नाव योग्य असल्याचा संघटनेतील प्रत्येक पदाधिकाऱ्याचा दावा आहे" असे मत उपजिल्हाप्रमुख परेश पाटील यांनी व्यक्त केले. पूर्वीपासूनच निश्चित असलेली ही नियुक्ती अधिकृत करण्यासाठी महायुतीचे नेते तथा खासदार श्रीरंग आप्पा बारणे व पक्ष सचिव संजय मोरे यांनी देखील शिफारस पत्रे ही दिली आहेत. तर मंत्री उदय सामंत व भरत गोगावले यांनीही सोमण यांचेच नाव दूरध्वनीवरून भाजपच्या नेत्यांना यापूर्वी सुचवले होते. येत्या सहा तारखेला पालिकेच्या महासभेत याबाबत अधिकृत घोषणा होईल. मुख्य नेते एकनाथ शिंदे, राजकारणाचे बाळकडू पाजणारे शिवसेना स्थानिक नेते चंद्रशेखर सोमण, खासदार श्रीरंग आप्पा बारणे, संजय मोरे, आमदार प्रशांत दादा ठाकूर यांसह एक दिलाने सोबत उभे राहणाऱ्या सर्व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचे सोमण यांनी आभार मानले. नामनिर्देशन अर्ज दाखल करताना आज प्रथमेश सोमण यांच्याबरोबर महापौर तथा गटनेते नितीन भाई पाटील, नगरसेवक प्रकाश बिनेदार जेष्ठ शिवसैनिक रमेश गुडेकर, उपनेते शिल्पाताई देशमुख, संपर्कप्रमुख राजेंद्र यादव, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, तळोजे शहरप्रमुख विशाल पवार, उपशहर प्रमुख अर्जुन परदेशी, शैलेश जगनाडे, विभागप्रमुख आशिष पनवेलकर, प्रसिद्धी प्रमुख तोफिक बागवान, मंदार काणे, शाखाप्रमुख किरण कळवेकर, किरण पवार व इतर शिवसैनिक उपस्थित होते.